CNR NO.MHRT05-000-306-2017.

## रेग्युलर दिवाणी मुकदमा क्र.४६/२०१७.

**श्रीमती कृष्णीबाई सोनू हुमणे** वादी

विरुध्द

**श्री.गणपत बाबू साळवी वगैरे ४** प्रतिवादी

## नि.४३ वरील आदेश

१. वादी यांनी सदरचा अर्ज वारस मुदतीत रेकार्डवर न आणलेने प्रस्तुत दाव्याचे कामी झालेली अबेटमेंट रद्द होऊन वारस दाखल करणेस परवानगीसाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांच्या कथनाप्रमाणे प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द ठराव, वाटप व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. ३ श्रीमती गंगु बाबू कोतेरे यांचे ता.०८/१२/२०१९ रोजी आंबये येथे तसेच त्यांचे वारसांपैकी एक मुलगा कै.वासुदेव बाबू कोतेरे यांचे ता.२९/०६/२०२० रोजी आंबये येथे मयत झाले असल्याचे वादी यांना हल्लीच समजले. त्यामुळे प्रस्तुतचे दाव्यात प्रतिवादी क्र. ३ व कै.वासुदेव बाबू कोतेरे यांचे वारसांना सामील करुन सदर वारसां विरुध्द दावा चालविणेचा हक्क वादी यांना आहे. परंतु प्रतिवादी क्र. ३ व कै.वासुदेव बाबू कोतेरे यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर न घेतल्याने वादी यांचा दावा अबेट झालेला आहे. वादी यांनी जाणुन–बुजुन अबेटमेंट केलेली नाही. प्रतिवादी क्र. ३ व कै.वासुदेव बाबु कोतेरे यांचे वारसांना रेकॉर्डवर घेतलेने वादी यांचे

दाव्याचे स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. तसेच वादी यांस प्रतिवादी क्र. ३ व कै.वासुदेव बाबु कोतरे हे मयत झाल्याची माहिती वेळीच न समजलेने त्यांचे वारसांची नावे दाव्यामध्ये दाखल करता आली नाहीत. तरी प्रस्तुत दाव्याचे कामी झालेली अबेटमेंट रद्द होऊन वारस दाखल करण्याची परवानगी मिळण्याची वादी यांनी विनंती केली आहे.

**३.** वादी याचे पुढे कथन की, प्रतिवादी क्र. ३ व कै.वासुदेव बाबू कोतेरे यांचे वारस रेकॉर्डवर येणे आवश्यक आहे. अन्यथा वादी याचे कधीही भरुन न येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे. मात्र प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सदर दाव्यामध्ये कोणत्याही स्वरुपाची तांत्रिक बाब उदभवु नये याकरीता प्रतिवादी क्र. ३ व कै.वासुदेव बाबू कोतेरे यांच्या वारसांना आवश्यक पक्षकार म्हणुन सामील करणे आवश्यक आहे.

**४.** प्रतिवादी क्र. १ यांनी त्याच अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. वादीचा अर्ज खोटा खोडसाळ व चुकीचा आहे असे म्हणणे दाखल करुन वादी विनाकारण विलंब करीत आहे. अबेटमेंट का व कोणत्या कारणामुळे झाली याचे कोणतेही योग्य रास्त कारण वादीने अर्जात दिलेले नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ यांनी वादीचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे. तसेच वादीचा अर्ज अपुर्ण व मोघम आहे असे म्हणणे दाखल केले आहे.

**५.** मी वादी व प्रतिवादी क्र. १ यांचे सन्माननीय विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या कथनांच्या अनुषंगाने युक्तीवाद केला. प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाकरीता खालील प्रश्न उपस्थित होतात. त्यावरील माझे कारणांसहित निष्कर्ष खालीलप्रमाणे–

| अनु.क्र. | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| १ | वादी मागणी प्रमाणे अबेटमेंट रद्द होऊन मिळणेस पात्र आहे काय ? | होकारार्थी. |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**प्रश्न क्र १ व २ –**

**६.** मी दाव्याचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी यांचे विरुध्द ठराव, वाटप व निरंतर ताकीदीकरीता आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी नि.२९ येथे कैफियत देऊन वादीचा दावा स्पष्टपणे नाकारला आहे. तसेच प्रस्तुत अर्जावर म्हणणे देवुन वादीचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे. वादीने प्रस्तुत अर्जात केलेली अबेटमेंट रद्दची मागणी पाहता असे दिसुन येते की, वादी ही वयोवृध्द असुन प्रतिवादी क्र.३ व कै.वासुदेव बाबू कोतेरे यांचा मृत्यु लॉक डाऊनच्या कालावधीत झालेला दिसुन येतो. असे वादीने हजर केलेल्या नि.४८/१ व नि.४८/२ सोबतच्या मृत्यु दाखल्यावरुन दिसते. वादीने प्रस्तुत अर्जाच्या पृष्टयर्थ नि.४४ येथे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यामुळे दाव्याचे स्वरुप पाहता, वादी व प्रतिवादी यामधील विवादीत मुद्दे विचारात घेता वादीची अबेटमेंट रद्द केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही असे दिसते. त्यामुळे न्यायाच्या व हिताच्या दृष्टीकोनातुन अर्ज मंजूर करणे उचित ठरेल असे प्रतित होते. म्हणुन मी प्रश्न क्र. १ चे उत्तर होकारार्थी देऊन प्रश्न क्र. २ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीला प्रतिवादी क्र. ३ व कै.वासुदेव बाबु कोतेरे यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास परवानगी देण्यात येत आहे.

(आदेश खुल्या न्यायालयात पारीत केला असे.)

दिनांक : २०/०९/२०२१ ( पी. एस. जाधव )

ठिकाण : खेड सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर, खेड

The contents of PDF file of order / Judgments are as per the original file.

Name of the Court :-Jt. Civil Judge, J.D., Khed, Tal. Khed, Dist.Ratnagiri.
Name of Stenographer :- Smt. Neha Shekhar Desai
Name of the P.O. :- Sou.P.S.Jadhav.
Date of Pronouncement :- 20.09.2021
Order signed on :- 20.09.2021
Order uploaded on :-21.09.2021